14) A thematic approach to the short stories of Nadine Gordimer
Vishnu Pundali Shekokar & Dr. MANGESH ADGOKAR, Jhunjhunu, Rajasthan ||66

15) Erosion of Traditional Knowledge and the Need for Institutionalisation in ...
Dr. Suresh Babu P., Changanacherry ||69

16) Challenges and Problems for Indian Economy due to Population Explosion
Dr. Tiparse Ashok P., Dist. Nanded ||74

17) Gender Justice and Issue of Child Custody
Rajendra Prasad Verma, Bikaner(Rajasthan) ||79

18) A Study of Subalterns: African-American and Dalit Literature
Dr. Santosh L. Wankhede, Dist: Jalna ||85

19) Teaching of Political Science Curriculum at B.Ed. Level: A Review
Owais Ahmad Siddiqui ||90

20) अण्णाभाऊ साठे यांची कांदबरी
डॉ. गोविंद उफाडे, लातूर ||96

21) भारतीय आदिवासी - लक्षणे आणि त्यांचे सांस्कृतिक व धार्मिक जीवन
प्रा. सतिष प्रकाश अहिरे, ता. जि. धुळे (महाराष्ट्र) ||101

22) धुळे, जिल्हा व शहरातील बालकामगार : संख्यात्मक स्थितीचा अभ्यास
प्रा. डॉ. तलवारे जितेंद्र दगडु & प्रा. देसले सुरेश रमण, जि. धुळे ||104

23) विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन अनुशेषाची सद्यस्थिती
गायकवाड अमोल पांडुरंग, औरंगाबाद ||108

24) श्री.समर्थ रामदास स्वामींची जन्मभूमी श्री क्षेत्र जांबसमर्थ परिसराचा ॰ - एक भौगोलिक अभ्यास
प्रा.डॉ. भाऊसाहेब सोनाजी देवकर, जि. जालना ||110

25) मराठीचा भाषालक्ष्यी अभ्यासक्रम : अध्यापनाच्या दिशा
डॉ. विठ्ठल जंबाले, देगलूर ||116

26) भारतीय महिलांचे सामाजिक क्षेत्रातील ऐतिहासिक योगदान :
प्रा.डॉ. गजानन नत्थुजी कळंबे, भंडारा ||121

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.387(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | April 2020 Issue-64, Vol-03 | 0

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

**25**

# मराठीचा भाषालक्ष्यी अभ्यासक्रम : अध्यापनाच्या दिशा

**डॉ. विठ्ठल जंबाले**
पदवी आणि पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख,
संचालक, मराठी भाषा साहित्य संशोधन केंद्र,
देगलूर महाविद्यालय देगलूर

***********

**प्रस्तावना :** आजच्या काळात मराठीचा अभ्यासक्रम साहित्यकेंद्रित असून त्यात भाषा वैशिष्ट्ये अंतर्भूत करणे, भाषा अध्ययनाला महत्त्व प्राप्त करून देणे आवश्यक आहे. सीमाभागातील महाविद्यालयात पदवी व पद्व्युत्तर स्तरावर मराठी विषयाचे अध्ययन साहित्यानुगामी स्वरूपाचे आहे. त्यात भाषा अध्ययन वाढविणे आवश्यक आहे. मराठी विषयाच्या सीमाभागातील भाषा परिसरात कन्नड, तेलगू, उर्दू तथा अन्य भाषांच्या प्रभावातून मराठी विषयाचे अध्यापन झालेले आहे, होत आहे. या अध्ययनाला आणि अध्यापनाला चालना देण्यासाठी मराठी विषय सक्तीचा करणे गरजेचे आहे. देगलूर आणि उदगीर तालुका परिसरात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद व गुलबर्गा विद्यापीठ कलबुर्गी हे विद्यापीठे आणि त्याच्याशी संलग्नित महाविद्यालये येथील अभ्यासक्रमात मराठी विषयाचे नियमित अभ्यासक्रम अध्यापन करणारी आणि त्यासोबतच बहिःस्त किंवा दूरशिक्षण आणि मुक्त शिक्षण अशी उच्चत शिक्षणातील अभ्यापसक्रमाची व्यावस्थाव आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, टिळक विद्यापीठ पुणे, गोखले विद्यापीठ पुणे, इंदिरा गांधी ओपन विश्‍वतविद्यालय भोपाळ, मौलाना आझाद राष्ट्री य उर्दू विश्‍व विद्यालय, हैदराबाद या विद्यापीठाचे अभ्यासक्रम शिकविणारे केंद्र या परिसरात आहेत. महाराष्ट्राच्या पूर्व दक्षिण कोपऱ्यातील दक्षिण भारताचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले आणि —उदगीर तालुक्यांच्या सीमालगत कर्नाटक देगलूर तेलंगणासह मराठी परिसरात उपरोल्लेयखित विद्यापीठीय आणि अभ्यासक्रम शिकविले जातात. त्या अभ्यासक्रमाला माहितीचे ज्ञानात रूपांतर करणे, ज्ञानातून संदेशाची निर्मिती करणे, संदेशातून मूल्यसंस्कार व आणि मूल्ये संस्कारातून समाज बांधणी करणे य न ज्ञान प्रक्रियेचा परीघ लक्षात घेऊन विविध वि च्या मराठीच्या अभ्यासक्रमाची आखणी करण्या आलेली आहे.

भाषेला पुढील कारणांमुळे महत्व प्रा झाले आहे. भाषा ही शिक्षणाचे माध्यम असते. भाषेच कीच्या भावनिक, बौद्धिक व क्रियात्मक विकासात वाटा असतो. सामाजिक व्यवहारात संपर्काचे चार विनिमयाचे साधन म्हणून भाषेला विशेष मह सते. भाषेच्या माध्यमातून मूल्यसंक्रमणाचे आणि कृती संक्रमणाचे कार्य घडत असते. माहिती आ ज्ञानाचे लोकांच्यां भावनेशी नाते जोडणारी अध्यय णाली विकसित करणे हे एकंदरित विद्यापीठाच्या ठीच्या अभ्यास मंडळापुढील सर्वात मोठे आवा आहे. यासाठी अध्ययनाची सवय निर्माण करणे, हेला टप्पा असून वाचकांचा प्रतिसाद वाढवि साठी अध्ययनाची मुक्त संहिता विद्यार्थ्यांच्या हाती भावर भर देणे गरजेचे आहे.

'सत्याचा अनुभव वेदी सत्यपणे
अनुभवाच्या गुन्हे रुची येते'

हे संत तुकारामांचे सूत्र विद्यापीठी भ्या सक्रमाच्या पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीचे सूत्र अ भाषा आणि साहित्याची पाठ्यपुस्तके ही स्वतः णि इतर विश्वाला जाणून घेण्याची माध्यमे बनाय ीत, यासह वाङ्मयाच्या अभ्यासाची सहयोगी अध्य द्रती विद्यापीठ निर्माण करीत आहे. भाषा हे यु ाचे उपकरण आहे, जनसंवादाचे माध्यम आहे. तसे तून निर्माण झालेले साहित्य ही समाजाचे अभिरु णि मूल्ये संस्काराचे चैतन्य स्त्रोत असून व्यापव नि लोककल्याणाचे संघटनतत्व म्हणून साहि च्या आशयाला एक सांस्कृतिक कार्यही आहे. नि साहित्याचा एक सांस्कृतिक घटित म्हणून स

* Dist.Nanded *

व्हावा, ही पायाभूत भूमिका आहे. हे सर्व लक्षात घेऊन विद्यापीठाने आपल्या मराठीच्या अभ्यासक्रमाची आखणी केलेली आहे. मराठी भाषेला व्यवहारभाषा, ज्ञानभाषा आणि साहित्याची भाषा म्हणून जो सर्वव्यापी वापर होत आहे, त्याची पायाभूत जाण निर्माण करणे हे विद्यापीठीय अभ्यासक्रमाचे महत्वाचे ध्येय धोरण आहे. लोकभाषा आणि ज्ञानभाषा यात संवाद निर्माण करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली असता विद्यापीठाने मराठी भाषेचा या दोन्ही अंगाने समवाय संबंध ओळखून आपल्या अभ्यातसक्रमाची निर्मिती केली आहे. अभ्यासक्रमातील प्रत्यक्ष उदाहरणांनी हा मुद्दा अधिक स्पष्ट करता येईल.

**मराठीच्या भाषालक्ष्यी अध्यापनाच्या दिशा —**

विद्यापीठांच्या अभ्यास केंद्रात किंवा महाविद्यालयामध्ये शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उच्च शिक्षणाचा आरंभ करण्यापूर्वी एक पूर्वतयारी अभ्यासक्रम पूर्ण करणे अनिवार्य आहे. या अल्प मुदतीच्या शिक्षणक्रमात वाचावे कसे? मुद्दे कसे काढावेत? आशयाची सूत्रे लक्षात ठेवण्यासाठी नजरेसमोर अभ्याउसाच्या साखळ्या कशा तयार कराव्यात? अशी काही अध्ययन कौशल्य शिकविणे अपेक्षित असते. त्याच्या जोडीला तो अध्ययनासाठी आवश्यक असणारी भाषा शक्यातो दैनंदिन व्यवहारभाषा आणि ज्ञानभाषा, ज्ञान—विज्ञानाची भाषा आणि साहित्यातील भाषा यातील फरक कळला पाहिजे.

रोजची व्यवहारभाषा आणि ज्ञानभाषा यातील भेद समजणे, ज्ञान—विज्ञान— तंत्रज्ञानाच्याा भाषेत परिभाषा, व्याख्या, ग्रहितके, सिद्धांत, दाखले, आलेख, तालिका, कोष्टके, प्रभाव, दर्शिका यांचा अर्थविवरणाची उपकरणे म्हणून वापर कसा होतो, हे त्याच्या लक्षात येते. साहित्याच्या भाषेत उपमा, रुपक, प्रतिभमादि अलंकारांतून सौंदर्यमूल्ये वृद्धिंगत होण्यालसाठी दृष्टांत, दाखले यांमधून अर्थविवरण आणि कथा— मिथक यामधून मूल्यसंस्कार घडविणाऱ्या आशयाचा पोत कसा तयार होतो, याची विद्यार्थ्यांना थोडीफार तोंडओळख होते. भाषेतील विवरणशास्त्राची आणि सौंदर्यतत्त्वांची प्राथमिक ओळख होऊन त्याच्या मराठीच्या अभ्यासाची सुरुवात होते. पदवीच्या पहिल्या वर्षी मानव्यविद्या शाखांचा अधिष्ठान अभ्यासक्रम आपसूकच मुक्त विद्यापीठाचा विद्यार्थी साहित्य, चित्र, शिल्प, संगीत, नृत्य, नाट्य, चित्रपट आदि कलांची ओळख निर्माण होऊन त्याअनुसार तयार होणारी समाजभाषा कशी अवतरते, याचा परिचय विद्यार्थ्यांना होतो. इतर कलांची भाषा आणि साहित्याची व्यवहारभाषा यातील साम्यय—भेद आणि कला प्रकारांची स्वतंत्र माध्यमे असतात, हे त्यांना कळायला लागते. एकूण कला व्यवहारामागे एकंदरित जीवनाचा भौतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवहार नांदत असतो, याचे भान विद्यार्थ्यांना येते.

**प्रतिमा—** प्रतीकांच्या भाषेतून प्रकट होणारा मानवी संवेदनस्वभाव आणि मानवी मनुष्यत्वाच्या संस्थात्मक जीवनाचा मूल्यात्मक अविष्कार प्रकट होत असतो. मंदिर, शिल्पे, गड—किल्ले, घर या सार्वजनिक बाबींच्या शैली व चित्रपट कलेतील विविध संप्रदाय त्यातून सांस्कृतिक संचिताचे वहन होत असते. या आशय दृष्ट्या कलांची त्यांची भाषा आणि चिन्हात अंतर्भूत झालेली संस्कृतिक लिपी वाचण्याचे कौशल्य अध्ययनकर्त्यायला अवगत होते. या अभ्यासातून कलांच्या संघटनतत्वाची अभ्यासकांना जवळून माहिती कळते. उदाहरणार्थ— प्रमाणरूप आणि सादृश्य याचे चित्र कसे पाहावे, याचे एक अध्ययनसूत्र अध्यापनात सापडते. त्यांच्या व्यापक परिप्रेक्ष्यीतून साहित्याकडे पाहण्याची समज निर्माण करण्यासाठी लागणारी पूर्वतयारी पदवी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमातून होते. कलांमागील **व्यापक—** संस्थात्मक समाज जीवनाचा प्रेरणास्रोत त्यांना कळायला लागतात.

मानव विज्ञानांचे आणि ललित कलांचे अधिष्ठान नियमित अभ्यासक्रमासोबत पदवीच्या पहिल्या वर्षाचा विद्यार्थी मराठी भाषेचा पायाभूत अभ्यासक्रमामुळे मराठी भाषेकडे सामाजिक अभिसरणाचे माध्यम म्हणून पाहतो. या अभ्यासातून तो दृष्टिकोन तयार होतो. मराठी भाषेकडे धर्मकारण, राजकारण, अर्थकारण, शासनव्यवहार, व्यापार, उद्योग याक्षेत्रांमध्ये व्यवहार घडविण्याचे कार्य असते. यासोबत सामाजिक अभिसरण होत असेल तर ते वाचण्याची एक नवी दृष्टी देण्याचा प्रयत्न या अभ्यासक्रमातून करण्यात येत आहे. ज्याज भाषेतून समाजाचे दर्शन घेण्याची वृत्ती तयार होते,

वैचारिक दर्शनाच्याअ परंपरांचे भान मिळते, जीवनाची क्षेत्र विस्तारत कशी नवीन भाषा नकळत येते, या भाषेच्या जडणघडणीत शास्त्र आणि व्याकरण परंपरेच्या चौकटीपेक्षा उच्चारसौष्कर्य आणि लोकविस्मृतीत सहजता महत्त्वाची असते, हे लक्षात येते. मराठीची शब्दपरंपरा समृद्ध होण्यासाठी विविध प्रसारमाध्यमे आणि विशेषतः त्याममध्ये वर्तमानपत्रांचा मोलाचा वाटा असल्याचे लक्षात येते.

व्यवहारभाषेबरोबर भाषेचा सर्जनशील वापर वाढविण्यासाठी लागणारे शब्दभान रुजवण्याचे काम मराठी भाषेच्याह अधिष्ठान अभ्यासक्रमामधून केले आहे. समानार्थी, अनेकार्थी, द्वर्थी शब्दातील अर्थस्फोटाची जागा विद्यार्थ्यांना उमजते. म्हणी, वाक्प्रचार, प्रयोग यातून नांदणारी लोकं आविष्काराची रीत, उपरोध, उपहास इ. प्राकृतिक शैलीतून प्रकट होणाऱ्या आशयाच्या परिणामकारकतेने निवेदन कौशल्याचा प्रभाव कळतो. या सगळ्यांकडे पाहण्यासाठी लागणारे भाषाभान जागे होते. ललित साहित्य आणि वैचारिक साहित्य या दोन्ही ठिकाणी होणारा भाषेचा वापर कसा करावा, हे समजू शकते. ही समाजभाषा जगभरातील विद्यार्थ्यांना माहिती घेण्यासाठी भाषेचा सर्जनशील वापर करण्या साठी पुरक ठरते. याकरिता नियमित ऐच्छिक मराठी व द्वितीयभाषा मराठीच्याी अभ्यारसक्रमात स्वाध्याय कार्यपुस्तिका दिलेली आहे. तसेच अन्यक (बहि:स्थक, दूरशिक्षण, मुक्तर अभ्याचसक्रमात) अधिष्ठान अभ्यासक्रमात कलांच्या भाषेच्या संदर्भात अशी कार्यपुस्तिका तयार करणे अंतर्भूत असते. या दोन्हीतून त्यांचे संभाषणकौशल्यें व लेखनकौशल्ये् वाढते. हा एक काळजीपूर्वक अभ्यास करण्याफचा भाग आहे, हे ज्यास विद्यार्थ्योचा विषय अभ्याअस आहे त्यांनाच कळते.

बीएच्या शिक्षणक्रमामध्ये् मराठीचे अभ्यासक्रमाची सामान्य (द्वितीय भाषा – S.L.) आणि विशेष (ऐच्छिक मराठी) अशी दोन गटात विभागणी करण्यात आलेली आहे. सामान्य स्तरावर कथा, कादंबरी, कविता आणि नाटक या ठळक वाङ्मय प्रकारांचा अभ्यास प्रविष्टत आहे. तसेच मध्ययुगीन वाङ्मयीन प्रवाह आणि स्वातंर्त्योत्तर वाङ्मयीन प्रवाह यांचा अभ्यास समाविष्ट केला आहे. साहित्याचा एक वाङ्मय प्रकार म्हणून अभ्यास करताना त्यांनी प्रकारनिष्ठ संघटनतत्वे, कथा – कादंबरीचे संविधानक, पात्ररचना, वातावरण, लेखकाचा दृष्टिकोन, वातावरण, निवेदनपद्धती अशा अंगांनी अभ्यासाची रूप आणि रचना केंद्रीय अध्ययनपद्धती विद्यार्थ्यांना अवगत व्हावी हा दृष्टिकोन येथे ठेवणे गरजेचे आहे. लेखकाचा दृष्टिकोन आणि विशिष्ट प्रकारात उत्क्रांत झालेली आस्वातदपक्रिया परंपरा यांचा एक धावता पट विद्यार्थ्यांसमोर उभा राहील, याची काळजी अभ्यासक्रमामधून घेण्यात आलेली आहे. उदाहरणार्थ लघुकथा, नवकथा, ग्रामीणकथा, दलितकथा, स्त्रीवादी कथा अशी कथाअंतर्गत वळणे आणि निवडक नमुने अभ्यासासाठी निवडून कादंबरीच्या घाटातील आणि आशयातील विविध टप्पे त्यातील प्रवृत्ती – प्रवाहास स्थूलमानाने विद्यार्थ्यांना लक्षात घेता यावीत, अशी रचना पाठ्य–पुस्तकाची केली पाहिजे.

या रचनाकेंद्री अध्ययनाबरोबर साहित्याच्या वाटचालीकडे समग्र जीवन परिप्रेक्ष्यातून पाहण्याची व त्या अनुषंगाने साहित्य व्यवहारातून महाराष्ट्र संस्कृतीची जडणघडण उलगडण्याची भूमिका ठेवून मग वाङ्मयीन प्रवाहांचा अभ्यासक्रम आखण्यात आला आहे. मध्ययुगीन मराठीतील महानुभव, वारकरी, नाथ, रामदासी संप्रदायिक परंपरांच्या विविध प्रवाहांची चर्चा करणे, आर्ष आणि अभिजात काव्यांच्या परंपरेतून मराठी पंडिती साहित्याचा विस्तार कसा झाला, यांचे राजनीतिक कथन करणारे, विविध कारणांची नेतृत्वाची मीमांसा करणारे प्रखर वाङ्मय किंवा काव्य यामधून संस्कृकती आणि मराठी माणसांचे स्वभाव कसे प्रकट झाले आहेत, याचे महत्व जाणण्यसिाठी प्रस्तुधत अभ्याकसघटकांमधून घडणारे संस्कावर महत्वाले चे आहेत. धर्म, राजकारण, प्रशासन, याकरिता संस्कृत प्रचूर आणि पंडिती परंपरांच्या संदर्भातील मध्ययुगीन वाङ्मयीन प्रवाहांचा अभ्यास करण्याची भूमिका लक्षात घेऊन समाजकेंद्रीय व्यवहाराची ही दृष्टी, आकृतिबंध निवेदनशैली, अविष्कारतंत्रे, समाजातील प्रेरणास्त्रोत इ. मधून कशी संस्कारित होतात याचे भान विद्यार्थ्यांना यावे, यादृष्टीने पाठयपुस्तीकांची संपादने करण्यात

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

आलेली आहेत.

**सामाजिक—** आर्थिक वास्तवाच्या परिप्रेक्षांतून स्वातंत्र्योत्तर वाङ्मयीन प्रवाहांचा अभ्यास करता येईल, यादृष्टीने पाठयांशाची आखणी करण्यात आली आहे. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्याच्या संप्रदायाचे प्रेरणास्थान आणि वाङ्मयीन घाटातील प्रयोग यांच्या परस्पर संबंधाची जाण वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवून पाठ्यपुस्तके तयार करण्यात आलेली आहेत. या अभ्यास घटकांमधून विद्यार्थ्यांना वाङ्मयीन जाणिवा, भूतकाळ आणि वर्तमानकाळातील वाङ्मयामधील विविध प्रवाह आणि प्रवृत्तीसह बहुकेंद्रित आणि बहुआयामी अभ्यास करण्याची दिशा, या विषयीच्या आणि त्या त्यार वेळी सामाजिक स्थिती — गती विषयीचे आकलन वाढविण्यास उपयोगी ठरू शकते.

बीएच्या विशेष अभ्यासक्रमांची आखणी करताना मराठीतील पदवीधर आणि त्यांच्या वाट्याला येणाऱ्या व्यवसायक्षेत्राशी सांगड घालण्याचा प्रयत्न करणे आवश्यीक आहे. रोजगाराची हमी मिळेल असे अमुक व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी मराठी विषय घेणारे बहुतांश विद्यार्थी विचार करतात. प्रामुख्याने शिक्षकी पेशाकडे जाणारे असतात. काही विद्यार्थी प्रसारमाध्यमे, जनसंपर्क कार्यालये यासारख्या क्षेत्राकडे वळतात. मराठी विषयाच्या अभ्यासातून काही चांगले सर्जनशील साहित्यिक निर्माण व्हावेत, अशीही अपेक्षा असते. अभिरुची मूल्यसंवर्धनाच्या बाबतीत असलेला एक सुजाण —जबाबदार नागरिक घडावा, जाणकार पालक म्हणून आगामी वाटचाल व्हारवी अशा मराठीच्या विद्यार्थ्यांकडून किमान अपेक्षा ठेवण्यात येतात. म्हणूनच उपजीविकेच्या क्षेत्रात लागणारी भाषिक कौशल्य शिकता येणे आणि नागरी समाजाच्या जडणघडणीतील आपला वाटा ओळखून भान निर्माण करणे हे मराठीच्या अभ्यासक्रम निर्मितीचे मध्यीवर्ती सूत्र राखले पाहिजे. विद्यापीठाचा बीए मराठीचा विद्यार्थी प्रबोधनपर साहित्य आणि प्रसारमाध्यमांसाठी लेखन कौशल्य हे अभ्यासक्रम पूर्ण करतो. महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरा, मराठी वैचारिक आणि ललित वाङ्मयातील प्रबोधनाची आशयसूत्रे अभ्यासताना खंडन—मंडन, युक्तिवाद, वाद—प्रतिवाद, उपरोध — उपाहास, विडंबन — विनोद, टीका — भाष्यन, आवाहन आणि संस्कार इत्यादी कितीतरी निवेदनप्रकार विद्यार्थ्यांनी अभ्यास करता येतात. मराठी भाषेची अविष्कार शैली, त्यातील विविध विभ्रम अभ्यासताना मराठीचा संवेदनस्वभाव त्यानि समजतो. बालसाहित्याला मराठी विषयाच्या विद्यापीठीय शिक्षणक्रमात पद्व्युत्तर अभ्यासक्रमात स्वतंत्र स्थान देण्यात आले आहे. शालेय मराठीचा पाया भक्कम करण्यासाठी पालक शिक्षकांना बालसाहित्याचे महत्व ओळखता यावे, हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश असतो. समाजाच्या नैतिक बांधणीचे, अभिरुची व मूल्यसंस्काराचे माध्यम म्हणून बालसाहित्याकडे पाहिले जाते. समाजातील अंधविश्वास, मानवनिर्मित भय, दडपण, न्यूनगंड यापासून मुक्ती होण्यासाठी, सामाजिक सलोखा निर्माण होण्यासाठी, समता— बंधुभाव— लिंगनिरपेक्ष प्रेम आणि मानुषता निर्माण होण्यासाठी बालसाहित्यातील संस्कारक्षम आशायाचे मूल्यात्मक साहित्यप वाचन होण्याची गरज आहे. भावनिक ओलावा निर्माण करणे, स्वप्न पाहणे, नाती जोडणे यासाठी बालभाषेला संस्कारमूल्य देणारे सर्जनशील वाङ्मय आपल्या लेखकांनी लिहिलेले आहे. त्या बालसाहित्याचे मूल्ये वाढविण्यासाठी व भविष्यकालीन समाजधारणा निकोप बनविण्यायसाठी या अभ्यासक्रमाचा निश्चितच उपयोग होईल, याकरिता ते महत्त्वाचे आहेच.

ओवी, अभंग, गौळणी, भारुड, लावणी, तमाशा, म्हयणी, उखाण्यांची मौखिक अभिव्यक्तीची एक दीर्घ परंपरा आपल्याकडे आहे. अनेक बोलीभाषा, प्रादेशिक भाषा आणि जात — जमातनिष्ठ पोटसंस्कृत्या एकत्र नांदणारा मराठीचा संवेदनस्वभाव लोकवाङ्मयातून अभिव्यक्ता होत आहे. जनसंवादाची ही लोकमाध्यमे आणि लोकसंस्कृतीचे वहन करतात. हा सांस्कृतिक वारसा असून आधुनिक वाङ्मयात साहित्याचे नवसर्जन झालेले आहे. जीवनाचा समकालीन अनुभव, गतकालीन संकर आणि विषय घडविणार्या नव्याव योजना, अनुभव यातील सलगता साधणारे लिंगनिरपेक्ष मनुष्यनीतीकडे नेणारे स्त्रीवादी वाङ्मय, शापित यांच्या वेदनेला नव्या विधायक लढ्याकडे नेणारे दलित वाङ्मय, परंपरिक कथा— मिथक यांच्या संचिताला नवार्थप्रधान वापर करणारे नवे ग्रामीण व नागरी वाङ्मयीन प्रवाह यांच्यारशी

विद्यार्थ्यांचा परिचय होतो. मानवी संज्ञेचा लोकनेणिवेतील मूल्यात्मक आशय पेलणारा वाङ्मयीन वारसा वर्तमानसंदर्भात आणि भविष्यलक्ष्यीच दृष्टिकोनातून वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासावा या भूमिकेतून विद्यापीठाच्या मराठीच्या अभ्यासक्रमाची आखणी करता आलेली आहे.

आकाशवाणी, दूरचित्रवाणी, वृत्तठवाहिन्या इंटरनेट, वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथ, भित्तिपत्रके, घडीपत्रिका इत्यादी जनसंवादाच्यार विविध माध्यमांसाठी लेखनकौशल्य शिकविणारा प्रयोजनमूलक अभ्यासक्रम विद्यापीठाने तयार केलेला आहे. मराठीच्या विद्यार्थ्यांना व्यवसायाच्याव नवनवीन क्षेत्रात संधी मिळविता याव्यीत या भूमिकेतून अभ्यासक्रमाचे प्रारूप तयार करण्यात आले आहे. जाहिराती, निवेदने, घोषवाक्य, बातमी, पत्रके भूमिका माणिका इत्यादी संज्ञापन जगभरातील लेखन प्रकारांसाठी भाषिक कौशल्य विकसित करणारे व सौंदर्यतत्त्वे, आलेखनतंत्रे यांचा मेळ घालणारे जनसंवादाचे साहित्य निर्माण करण्याची क्षमता प्रदान करणारे असा अभ्यासक्रमाचा आशय आहे.

शोधनिबंधाचा सारांश संक्षिप्तपणे सांगताना विद्यापीठीय मराठीच्यो अभ्यासक्रमातील अध्ययन साहित्यातील वेचे संपादित करण्यामागची भूमिका आणि अध्ययन उद्दिष्टे यांच्यामागे एक सलग ध्येय असते. नवा अध्ययनशील समाज घडविण्यासाठी सामाजिक अभिसरणातील नवी भाषा नीती घडविणे, नवी वाङ्मयीन अभिरुची विकसित करणे, नवे मूल्यभान रचण्यासाठी भाषा व साहित्यातील स्फोटतत्व चेतवण्याचच्या क्षमता निर्माण करणे, तंत्रवैज्ञानिक प्रगतीच्या रेटयात मराठी संवेदनस्वभावाला अधिक चोखंदळ बनवणे, मूल्यांसाठी संघर्षशील डावपेचांचा तरल वापर करण्याची तत्परता दाखविणे, भयमुक्त मराठी मन घडविणे, सामाजिक अभिरूचीला वळण देण्यासाठी आपली भूमिका विशद करणे इत्यादी वैशिष्ट्ये केंद्रिभूत ठेवून प्रस्तुत अभ्यासक्रमाची अध्ययन प्रणाली विकसित झालेली आहे. समाजाच्या टिकाऊ विकासाचे माध्यम म्हणून साहित्याच्या अभ्यासक्रमाचे स्थान निर्माण करण्याचा एक नवा प्रयत्न या विद्यापीठाने आरंभ केला आहे. साहित्याच्या रुपबंधातील सौंदर्यतत्त्वांच्याण संघटनेचा सूक्ष्मलक्षी अभ्यास मानव्य विद्यांच्या समग्रलक्ष्यी चौकटीतून करण्याची भूमिका घेऊन या अभ्यासक्रमाची आखणी केलेली आहे. पाठ्यपुस्तकातील वेच्यांचे अध्ययन करण्यासाठी लागणारे विवरणशास्त्र स्वआर्थ अध्ययन प्रणालीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अवगत करता यावे. म्हणून कार्यपुस्तिका, प्रकल्पकार्य, स्वयंअध्ययन, गृहपाठ यांची आखणी करण्यात आली आहे.

**समारोप** : वाङ्मयीन संहितेच्या आकलनातले वाचकांचे स्वातंर्त्य अबाधित ठेवणारी अनुदेशनप्रणाली याद्वारे निर्माण होत आहे. भाषा ही जड वस्तू नाही, ती चिद्वस्तू आहे. भाषेतून अर्थ निर्माण होतो, हा महात्मा गांधी यांचा विचार अर्थ पुस्तकात नाही, समाजात पसरला आहे, हा विनोबा भावे यांचा विचार, भाषा कधीच खाजगी नसते, ते एक संपूर्ण सामाजिक वास्तव असते. हा समाजभाषावैज्ञानिकांचा दृष्टिकोन, शिक्षणाचे सामाजिकीकरण करण्यासाठी लोकभाषा आणि ज्ञानभाषा यातील अंतर मिटविण्याचे यशवंतराव चव्हाण या लोकनेत्यांचे आवाहन आणि विद्यार्थी हा ज्ञानव्यवहारातील गिऱ्हाईक नसून भागीदार आहे, ही भूमिका या सगळ्यांच्या एकत्रित मेळ घालून विद्यापीठाच्याल मराठी विषयाच्याभ अभ्यासक्रमाची अनुदेशनप्रणाली तयार केलेली दिसते. नवा नागरी समाज घडविण्याचे व्यालपक ध्येय साधण्याअतील टप्पा म्हणून मराठीच्या अभ्यासक्रमांना नवे सत्व प्राप्त करून देण्याचा एक प्रयत्नी या विद्यापीठाने केला आहे. त्यायमुळे सीमाभगातील देगलूर– उदगीर परिसरातील व उर्वरित महाराष्ट्राच्या सर्वच भागातील मराठीच्या शिक्षकांच्या सहभागातून मराठीच्या– शिक्षणाची एक नवी नीती यातून आकाराला येईल असा विश्वास आहे.

संदर्भग्रंथसूची —

महाराष्ट्र शासन मुंबई — अभ्यासक्रमात माहिती तंत्रज्ञान शासनाची भूमिका, शालेय शिक्षण विभाग, जानेवारी २००२.

आवलगावकर अविनाश व शहा मृणालिनी– मराठीचे भवितव्य, मानसन्मान प्रकाशन पुणे, २००१

उंडले म.बा. — मराठीचे अध्यापन, श्रीविद्या

प्रकाशन, पुणे, १९७४

सीमाभागातील महाविद्यालयामध्ये प्रत्यक्ष भेटी आणि माहिती संकलन – १ एप्रील, २०१८ ते ३१ जानेवारी, २०२०

डॉ. जागृती पवार व प्रा.जितेंद्र खंडाळकर – मराठी आशययुक्त अध्यापन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती –२०१७

डॉ. शैलजा भंगाळे व डॉ पिंगला धांडे– अध्ययनासाठी मूल्य निर्धारण, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती –२०१८

डॉ. शैलजा भंगाळे – अध्ययनकर्ता आणि अध्ययन, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, द्वितीयावृत्ती० –२०१४

❑❑❑

Dr. Anil Chidrawa.
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

**26**

# भारतीय महिलांचे सामाजिक क्षेत्रातील ऐतिहासिक योगदान :

प्रा.डॉ. गजानन नत्थुजी कळंबे
इतिहास विभाग प्रमुख,
प्रगती महिला कला महाविद्यालय भंडारा

**सारांश (Abstract)**

प्राचीन काळात भारत अत्यंत वैभव संपन्न होता. हडप्पा कालखंडात तर मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात होती. वैदिक काळात अनेक स्त्रियांचा उल्लेख आढळतो. गारगी, मैत्रयी अपालघोषा या सारख्या अनेक कर्तबगार महिला होवून गेल्या. वैदिक साहित्याची रचना करण्यात त्यांचा महत्वाचा वाटा होता. परंतु उत्तर वैदिक काळात मात्र हळूहळू स्त्रियांचे महत्व कमी होवू लागले त्यांना दुय्यम स्थान दिल्या जावू लागले. समाज रचना पुरुष प्रधान होवू लागली. स्त्री आणि पुरुष यांच्या कामाची विभागणी झाली तसेच घराबाहेरची कामे पुरुषांनी तर घरातील कामे स्त्रियांकडे सोपविली गेली. यातूनच चूल आणि मूल ही जबाबदारी स्त्रियांवर येवून पडली. त्यामुळे स्त्री कर्मकांड आणि अनिष्ठ प्रथेत गुंतत गेली. त्यातच समाजात बालविवाह, विधवा विवाहाला विरोध, बहूपत्नीत्व पद्धती ,पडदा पद्धती सती प्रथा रूढ होवू लागली. स्त्रियांचे स्थान दुय्यम होवू लागले. त्यामुळे स्त्रिया त्यांच्यावर होणारा अन्याय मुकाट्याने सहन करू लागली .

१९ वे शतक खऱ्या अर्थाने स्त्री प्रबोधनाचे युग म्हणून संबोधले जाते कारण याच कालखंडात जगात स्वातंत्र, समता, बंधुत्व या तत्वांना अधिकच महत्व प्राप्त झाले. या सोबतच समाज सुधारणा चळवळीला सुरुवात झाली. त्यातच स्त्री पुरुष समानता याला महत्व प्राप्त झाले. स्त्रिया पुरुषांपेक्षा कोणत्याच क्षेत्रात